
केंद्राच्या यादीवरचे व राज्यशासनाच्या यादीवरचे संपूर्ण महाराष्ट्रात वितरित होणारे दैनिक



दैनिक राजस्व

RNI. NO. MAHMAR 2011/39185



सोलापूर ▸ वर्ष १५ वे ▸ ९९ मराठी सायंदैनिक ▸▸ शनिवार २२ ऑगस्ट २०२६

# जेन-जी सोबत कनेक्ट होण्यासाठी भाजपच्या विशेष टीमची घोषणा विनोद तावडेंना पुन्हा मोठी जबाबदारी

भाजपने 'जनरेशन-जी'



म्हणजेच तरुण मतदारांशी संपर्क साधण्यासाठी एक विशेष टीम तयार केली आहे. यामध्ये भाजप अध्यक्ष नितीन नवीन, राष्ट्रीय सरचिटणीस स्मृती इराणी आणि विनोद तावडे यांच्यासह गुजरातचे मंत्री हर्ष संघवी आणि छत्तीसगडचे मंत्री ओ. पी. चौधरी यांचा समावेश आहे. या सदस्यांच्या माध्यमातून पक्ष तरुणांशी थेट संवाद साधून त्यांचे विचार, समस्या आणि अपेक्षा समजून घेईल.

'वंदे मातरम'च्या आदराशी तडजोड केली जाणार नाही दरम्यान, नितीन नवीन यांच्या अध्यक्षतेखालील नवीन ६५ सदस्यीय राष्ट्रीय टीमची पहिली बैठक दिल्लीतील भाजप मुख्यालयात पार पडली. 'वंदे मातरम' संदर्भात काँग्रेसच्या निर्णयाविरोधात एक ठराव मंजूर करण्यात आला. काँग्रेसच्या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीताचे केवळ दोन परिच्छेद गाण्याच्या निर्णयाचा भाजपने निषेध केला. राजकीय सोयीसाठी किंवा लांगुलचालनासाठी 'वंदे मातरम'च्या आदराशी तडजोड केली जाणार नाही, असे पक्षाने म्हटले आहे. भाजप देशभरात आपला वारसा जपण्यासाठी मोहीम सुरू करणार आहे. नितीन नवीन यांची नवीन टीम आज (२२ ऑगस्ट) सायंकाळी ७ वाजता भाजप मुख्यालयात पंतप्रधान मोदींची भेट घेणार आहे. १७ ऑगस्ट रोजी टीमची घोषणा करण्यात आली.भाजप १४ ते २५ वयोगटातील तरुणांशी संपर्क साधणार भाजपची नवीन टीम 'जनरेशन-जी' मतदारांमध्ये 'युवा संवाद' मोहीम सुरू करणार आहे. या उपक्रमांतर्गत, १४ ते २५ वयोगटातील तरुणांना सहभागी करून घेण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. तरुण मतदारांपर्यंत पक्षाची पोहोच आणि त्यांच्याशी असलेले संबंध अधिक दृढ करणे, -हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. यामध्ये भाषणे, चर्चा आणि युवा संवाद यांसारख्या कार्यक्रमांचा समावेश असेल. या कार्यक्रमांच्या माध्यमातून 'जनरेशन-जी'चे विचार, चिंता, गरजा आणि अपेक्षा समजून घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

तरुणांना भाजप नेत्यांशी थेट संवाद साधण्याची आणि आपले प्रश्न मांडण्याची संधीही दिली जाईल. कार्यक्रमाचे वेळापत्रक, स्वरूप आणि ठिकाणाचा तपशील लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. 'वंदे मातरम'वर प्रचार करण्याचा निर्णय नवीन टीमच्या बैठकीत घेण्यात आला. दरम्यान, भाजप अध्यक्ष नितीन नवीन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नवीन टीमच्या बैठकीपूर्वी भाजप मुख्यालयात 'वंदे मातरम'चे सर्व सहा परिच्छेद गाण्यात आले. यानंतर, आगामी निवडणुका, संघटना मजबूत करणे आणि पक्षाच्या कार्यक्रमांवर चर्चा झाली. नितीन नवीन यांनी सांगितले की, पक्ष देशभरात वंदे मातरमचा सन्मान, प्रतिष्ठा आणि वारसा जपेल. स्वातंत्र्य चळवळीतील वंदे मातरमचा इतिहास, अर्थ आणि महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक मोहीम सुरू केली जाईल.

# मला मंत्रिमंडळात संधी मिळण्याचे चान्सेस १०० टक्के; खासदार बंडू जाधव काय म्हणाले

परभणी : केंद्रीय मंत्रिमंडळाचा लवकरच विस्तार होणार असून



एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतील मंत्र्यांची संख्या वाढणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्यामध्ये, खासदार ओमराजे निंबाळकर आणि परभणीचे खासदार संजय बंडू जाधव यांचे नाव आघाडीवर असून फुटीर खासदारांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडणार असल्याचे समजते. त्याच पार्श्वभूमीवर विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना खासदार बंडू जाधव यांनी मंत्रिपद मिळणार असल्याचे म्हटले.

शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे हे येत्या ३० ऑगस्ट रोजी परभणी दौऱ्यावर असून परभणीत त्यांचा शेतकरी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती परभणीचे खासदार संजय जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जाधव यांनी सध्या सुप्रीम कोर्टात सुरू असलेली सुनावणी, उद्धव ठाकरे यांच्या गटाकडून सहा खासदारांना मिळालेली नोटीस, केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार, परभणीचा विकास निधी आणि डिफेंडर गाडी घेतल्याची चर्चा जिल्ह्यात आहे, या सर्व प्रश्नांना उत्तर दिली आहेत..

परभणीत शेतकरी शिवसैनिक संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आल आहे या माध्यमातून एकनाथ शिंदे हे परभणीतील सर्व शिवसैनिक शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत काही अडीअडचणी आहेत विकास कामांचा विषय जाणून घेऊन कार्यकर्त्यांना ते या मेळाव्याच्या माध्यमातून बळ देणार आहेत, असे बंडू जाधव यांनी सांगितले. तसेच, अडचणीत सापडलेल्या कार्यकर्त्यांच्या नेत्याच्या मदतीला धावून जाणारा नेता म्हणजे एकनाथ शिंदे आहेत. त्यामुळे परभणी शहराच्या आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची आपल्याला गरज आहे, असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार मला माहिती नाही, मोदी साहेबांना विचारा, केंद्राने विस्तार केंव्हा करावा हे भाजपाचे नेते ठरवतील. केंद्राने विस्तार ठरवला आणि माझ्या पक्षाने माझं नाव सुचवलं तर मला संधी मिळेल, सुचवलं किंवा नाही सुचवलं तरी मी चिंता करत नाही. मला संधी मिळण्याचे चान्सेस १००% आहेत, असे मला वाटते, असेहीयावेळी बंडू जाधव यांनी म्हटले. आमच्यात जेवढे आहेत तेवढ्यांना सगळ्यांनाच वाटते, आमच्या ओमराजेंना वाटते, आमचे जुने बारणे आप्पा आहेत त्यांनाही वाटते, मलाही वाटते. हे वाटणे साहजिक आहे मात्र द्यायचे का नाही द्यायचे हे नेत्याच्या हातात असते, असे स्पष्टीकरणही त्यांनी पुढे दिले. तर, आम्हाला नोटीस आल्याचा विषय पार्टी बघेल, पार्टीने वकील लावलेले आहेत, त्यांना नोटीस दिली असेल तर मलाही आली असेल. मात्र, जेव्हा आम्ही हा निर्णय घेतला तेव्हा या सगळ्या गोष्टींना फेस करायचा आहे हे विचार करूनच घेतलेला आहे, असे जाधव यांनी सांगितले.

# इथेनॉलमुळे ऐन सणासुदीच्या तोंडावर साखरेच्या किंमती दणादण वाढल्या?




साखरेपासून इथेनॉलच्या उत्पादनामुळे साखरेच्या किमती वाढल्या असल्याचा दावा सरकारने फेटाळून लावला आहे. अन्न आणि ग्राहक व्यवहार मंत्रालयाने सांगितले की, कमी उत्पादन, सणासुदीच्या हंगामातील मागणी आणि साठेबाजीमुळे किमती वाढल्या आहेत. साखरेच्या वाढत्या किमतींना आळा घालण्यासाठी साठा मर्यादा आणि शुल्कमुक्त आयातीची अंमलबजावणी करण्यात आली आहे. इथेनॉल उत्पादनामुळे साखर कडू झाली?

मंत्रालयाने म्हटले आहे की, साखरेच्या वाढत्या किमतींना इथेनॉल उत्पादनातील वापराशी जोडणे पूर्णपणे चुकीचे आहे. पेट्रोलमध्ये मिसळण्यासाठी इथेनॉल उत्पादनातील साखरेच्या उत्पादनाचा वाटा २०२२-२३ हंगामातील १२ टक्क्यांवरून २०२५-२६ हंगामात अंदाजे ९ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. सध्या, देशाच्या एकूण इथेनॉल उत्पादनापैकी अंदाजे ७५ टक्के उत्पादन धान्यांपासून, प्रामुख्याने मक्यापासून होते. भारतात दरवर्षी अंदाजे ३२-३४ दशलक्ष टन साखरेचे उत्पादन होते, ज्यात २८-२९ दशलक्ष टन अतिरिक्त उत्पादन शिल्लक राहते. पूर्वी, ही अतिरिक्त साखर कारखान्यांमध्ये अडकून राहत होती, ज्यामुळे त्यांचा निधी अडकून पडत होता आणि त्यांना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पैसे देता येत नव्हते. आता, सरकार ही अतिरिक्त साखर आणि ऊस वापरून इथेनॉल तयार करत आहे, जे पेट्रोलमध्ये वापरले जाते.

# पुण्यातील कार्यक्रमावरुन विखे पाटलांची राहुल गांधींवरही बोचरी टीका

अहिल्यानगर : दिल्लीतील जंतरमंतरवर झालेल्या नीट आंदोलनानंतर राहुल गांधी चांगलेच आक्रमक झाले असून झेन-जी तरुणाईशी सातत्याने संवाद साधत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज पुण्यात त्यांचा 'छात्रों की गुंज' हा कार्यक्रम होत असून विरोधकांनी या कार्यक्रमावरुन त्यांच्यावर टीका केलीय. छात्रो की गुंज या कार्यक्रमावरून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही राहुल गांधींवर टीका केली. तर, रोहित पवारांनाही टोला लगावला. राहुल गांधी यांनी सीजेपीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमिवर असे उपक्रम हाती घेऊन स्वतःच राजकीय पोळी भाजून घेण्याचं काम सुरू केलं आहे. मात्र, विद्यार्थ्यांना राहुल गांधी काय आहेत हे माहितीय, त्यामुळे त्यांचं कोणीही ऐकायला तयार नाही, अशी टीका विखे पाटलांनी केली.


लोकसभेत सलग तीन वेळा पराभव झाल्याने आणि जनतेतील त्यांची झालेली प्रतिमा खराब झाली असल्यानेच



राहुल गांधी या आंदोलनाचा उपयोग करून घेत आहेत, असे विखे पाटील यांनी म्हटले. मागे जेंव्हा सरकार आलं होतं, त्यावेळेला हे लोक झोपले होते का? आत्ताच यांना अशा गोष्टी का सुचतात असा सवालही विखे पाटील यांनी विचारला आहे. राहुल गांधींच्या छात्रो की गुंज कार्यक्रमात पैसे देऊन लोक आणले जात असल्याचा आरोप होतोय. त्यावरही विखे यांनी प्रतिक्रिया दिली. राहुल गांधी आपल्या राजकीय फायद्यासाठी विद्यार्थी आंदोलनाचा वापर करत आहेत.

# टेंभुर्णीच्या आरोही घळकेचे राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत यश

टेंभुर्णी प्रतिनिधी-टेंभुर्णी येथील कुमारी आरोही किरण घळके हिने २०२६ मध्ये झालेल्या महर्षी वाल्मिकी



शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राज्यस्तरीय ए.टी. एस. प्रज्ञाशोध परीक्षेत इयत्ता पहिली मध्ये १०० पैकी ९० गुण मिळवून राज्यात ६वी आणि जिल्ह्यात ३री आली.तसेच एवढ्यावर न थांबता मंथन वेलफ ेअर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत सुद्धा इयत्ता पहिली मध्ये १५० पैकी १२४ गुण प्राप्त करून राज्यात १४ वा आणि जिल्ह्यात ९वा क्रमांक पटकावला.तिच्या या अभूतपूर्व यशाबद्दल सारा पब्लिक स्कूल शाळेने व टेंभुर्णी काँग्रेस कमिटी आणि कुटुंबीयांनी अभिनंदन करून तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.तिने मिळवलेल्या या यशामुळे टेंभुर्णी गावाचे व मढा तालुक्याचे नाव राज्यात अभिमानाने उंचावले आहे. आरोहीला तिच्या यशामध्ये आई-वडिलांच व शाळेतील शिक्षकांच मार्गदर्शन लाभले. टेंभुर्णी गावातील ग्रामस्थांनी आणि नातेवाईकांनी तिच भरभरून कौतुक केल व तिने पुढे असेच शैक्षणिक क्षेत्रात नाव मोठे करावे अशा शुभेच्छा दिल्या.

# जलसंधारण दिनाच्या जिल्हास्तरीय स्पर्धेत भोसले विद्यालयाच्या विद्यार्थिनींची दमदार कामगिरी

धाराशिव : स्वर्गीय माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यानिमित्ताने धाराशिव येथील तुळजाभवानी स्टेडियमवर 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या जलसंधारणाच्या महत्त्वपूर्ण संदेशाला केंद्रस्थानी ठेवून जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांना विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या जिल्हास्तरीय स्पर्धेत श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थिनींनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीची छाप पाडत विद्यालयाच्या शिरपेचात मनाचा तुरा रोवला. अनुजा काकासाहेब मस्के हिने तीन किलोमीटर चालण्याच्या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. तर याच स्पर्धेत सानिया फुलारी हिने तृतीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.जलसंधारणासारख्या समाजहिताच्या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमात विद्यार्थिनींनी मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे. स्पर्धेत सहभागी होताना विद्यार्थिनींनी केवळ क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले नाही, तर जलसंधारणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उपक्रमातही सक्रिय सहभाग नोंदविला. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून पुढे नेण्याची जबाबदारी तरुण पिढीने स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचे यानिमित्ताने अधोरेखित झाले.स्पर्धेत यश संपादन केल्यानंतर श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक



विद्यालयात विद्यार्थिनींचा उत्साहात सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, कला विभाग प्रमुख कैलास कोरके आणि पर्यवेक्षक कुमार निकम यांच्या हस्ते अनुजा मस्के व सानिया फुलारी यांचा पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशाबद्दल शिक्षक व विद्यार्थ्यांनीही अभिनंदन केले विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थाध्यक्ष सुधीर अण्णा पाटील, सरचिटणीस सौ. प्रेमाताई पाटील, सीईओ आदित्य पाटील, उपप्राचार्य संतोष घारगे तसेच पर्यवेक्षक मोहनराव शिंदे यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा व जनजागृतीपर उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सातत्याने प्रोत्साहन दिले जात असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# पाणी व माती संवर्धनासाठी धाराशिवकरांची एकजूट ; नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

धाराशिव,दि.२१ ऑगस्ट (जिमाका) महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.सुधाकररावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त आज २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन साजरा करण्यात आला.पाणी आणि माती संवर्धनाची चळवळ केवळ सरकारी उपक्रम न राहता ती जनमनसाची चळवळ व्हावी, या उद्देशाने धाराशिव येथे 'महा वॉक्थॉन - वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले.सकाळच्या प्रसन्न वातावरणात नागरिक, विद्यार्थी, अधिकारी-कर्मचारी, खेळाडू तसेच विविध संस्था-संघटनांचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने जलसंधारणाच्या संदेशाला लोकसहभागाची जोड मिळाली. धाराशिव येथे आज शुक्रवार,२१ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता तुळजाभवानी स्टेडियम येथून वॉक्थॉनला उत्साहात सुरुवात झाली. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रभाकर महामुनी, जिल्हा क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे,जिल्हा परिषद जलसंधारण विभागाचे सुहास चव्हाण, जलसंधारण विभागाच्या उपविभागीय अभियंता सायली जाधव,हर्षदा पाटील,जीवन काकडे,शाखा अभियंता ज्योती जाधव,कांचन मलजे आणि बलराम पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी मुख्यमंत्री स्व.सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सहभागी नागरिकांना मृदा व जलसंधारणाची शपथ देण्यात आली. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून वॉक्थॉनला सुरुवात करण्यात आली.श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियमपासून सुरू झालेली वॉक्थॉन छत्रपती शिवाजी महाराज चौक,सेंट्रल बिल्डिंग,राम नगर, आनंदनगर,समतानगर मार्गे पुन्हा श्री तुळजाभवानी स्टेडियम येथे पोहोचली. या मार्गावर जलसंधारण,पाणी बचत आणि माती संवर्धनाचा संदेश देत सहभागी नागरिकांनी उत्साहाने वॉक्थॉन पूर्ण केली.नागरिकांसह शाळा- महाविद्यालयीन विद्यार्थी,विविध शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी, संस्था व संघटनांचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.'पाणी अडवा, पाणी जिरवा'चा संदेशजिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार म्हणाले की,पाण्याचे संवर्धन,भूजलपातळी वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी 'पाणी अडवा,पाणी जिरवा' हा मूलमंत्र आहे.या माध्यमातून जलसंधारणाची कामे लोकसहभागातून व्यापक स्वरूपात राबविणे आवश्यक आहे.पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविणे तसेच जलस्रोतांचे पुनरुज्जीवन केल्याने भूजलपातळी वाढण्यास आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता टिकवून ठेवण्यास मदत होते.पाण्याचा



वापर प्रत्येकाने गरजेनुसार आणि काटकसरीने करणे ही काळाची गरज आहे.२६ जानेवारीपर्यंत सुरू राहणाऱ्या पाणी संवर्धनाच्या विविध उपक्रमांमध्ये नागरिकांनी अधिकाधिक सहभागी व्हावे,असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी केले.

# गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

चिमूर / जावेद पठाण चिमूर तालुक्यातील मांगलगाव येथे शुक्रवारी (दि. २१ ऑगस्ट) दुपारच्या सुमारास सुखदेव विठ्ठल सोनटक्के (वय ४०) यांनी राहत्या घरी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, सोनटक्के हे घरी एकटे असताना त्यांनी घरातील स्लॅबला दोरी बांधून गळफास लावून आत्महत्या केली. आर्थिक परिस्थितीला कंटाळून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. मात्र, आत्महत्येचे नेमके कारण अधिकृतपणे स्पष्ट झालेले नाही . सुखदेव सोनटक्के आपल्या आई व चार वर्षीय मुलासोबत राहत होता त्याची पत्नी दीड वर्षीय मुली सोबत आपल्या माहेरी राहत होती . त्यांच्या मृत्यूनंतर आई, पत्नी, चार वर्षांचा मुलगा आणि दीड वर्षांची मुलगी असा परिवार आहे. या घटनेमुळे सोनटक्के कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून मांगलगाव परिसरात



हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच संबंधित पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया व तपास सुरू आहे.

# चिमूर तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण ४ सप्टेंबरला निश्चित होणार

चिमूर / जावेद पठाण चिमूर तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतींच्या सन २०२५ ते २०३० या पाच वर्षांच्या कालावधीसाठी सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. तहसीलदार तथा तालुका निवडणूक अधिकारी श्रीधर राजमाने यांनी याबाबत २० ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या १३ जून २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार सरपंचपदाचे जिल्हानिहाय आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ज्या जिल्ह्यांमध्ये सरपंचपदाचे आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा अधिक झाले आहे, त्या जिल्ह्यांमध्ये आरक्षणामध्ये सुधारणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार चिमूर तालुक्यातील ग्रामपंचायतींसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे. अधिकृत माहितीनुसार तालुक्यातील एकूण ९२ ग्रामपंचायतींपैकी अनुसूचित जातीसाठी १६ सरपंचपदे, त्यापैकी ८ महिलांसाठी आरक्षित आहेत. अनुसूचित जमातीसाठी ३३ सरपंचपदे, त्यापैकी १७ महिलांसाठी आरक्षित आहेत. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी सरपंचपदाची आरक्षित पदे ०, तर खुल्या प्रवर्गासाठी ४३ सरपंचपदे असून त्यापैकी २१ पदे महिलांसाठी आरक्षित आहेत. सरपंचपदाचे आरक्षण सोडत ४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता तहसील कार्यालय, चिमूर येथील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

# क्षेत्रभेटीतून विद्यार्थ्यांनी मिळवले बँकिंगचे व्यवहार ज्ञान

तुळजापूर(दि.२१) येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ च्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेट अंतर्गत बँकिंग व्यवहार चे ज्ञान प्राप्त केले. येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) या बँकेत विद्यार्थ्यांनी दैनंदिन बँकेच्या कामकाजाची माहिती घेतले तसेच बँकेमध्ये केले जाणाऱ्या विविध योजनेची माहिती त्याचप्रमाणे कर्ज पद्धत, व्याज पद्धत, आर्थिक देवाणघेवाण, बचत, विद्यार्थ्यांसाठी विविध योजना बँक खाते उघडणे एटीएम चेक बुक इत्यादी विषयाची सखोल माहिती घेतली.



यावेळी बँकेच्या डेप्युटी मॅनेजर सीमा जगताप, कर्मचारी अभिजीत जेवळीकर, फिल्ड ऑफिसर रोहन मोरे यांनी विद्यार्थ्यांना विविध माहिती सांगून बँकेबद्दल माहिती दिली.

तसेच तुळजापूर येथील वकील भारत बर्वे व संतोष सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना एटीएम मधून पैसे कसे काढावेत व पैसे कसे भरावेत याविषयीचे प्रात्यक्षिक करून दाखवले यावेळी मुख्याध्यापक गणेश रोचकरी, सहशिक्षक महेंद्र कावरे सुज्ञानी गिराम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पैसे भरण्याबाबत काढण्याबाबत बँकेच्या व्यवहाराबाबत माहिती दिली यावेळी इ.५,६,७ वीतील विद्यार्थी उपस्थित होते.

This daily evening news paper ,owner,publisher ,printer, Editor,Prasad Sanjay Pawar, printed at RAJASWA printing press , 53/A Budhawar Peth ,Laxman Maharaj Nagar ,SOLAPUR and published here It is not possible that editors of this article will agree ( solapur jurisdiction) Mo-7387386385

सायंदैनिक
राजस्व



# कुर्डुवाडी काँग्रेस अल्पसंख्यक विभाग यांच्यावतीने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना अभिवादन

कुर्डुवाडीत (प्रतिनिधी)

आधुनिक भारताचे शिल्पकार भारतरत्न माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती शहर काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग यांच्या वतीने साजरी करण्यात आली. प्रारंभी राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग शहराध्यक्ष हमीद शिकलकर , राष्ट्रवादी शरद पवारगट शहराध्यक्ष दत्ताजी गवळी , काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष फिरोज खान, काँग्रेस



अल्पसंख्यक तालुका उपाध्यक्ष जमीर सय्यद , साबीर शिकलकर, अशपाक मनेरी व आदी उपस्थित होते. शेवटी संयोजक हमीद शिकलकर यांनी सर्वांचे आभार मानले.

# श्रीराम च्या कृषिकन्यांनी केले सहभागी प्रात्यक्षिक मूल्यांवलोकन

नातेपुते प्रतिनिधी

माळशिरस तालुक्यातील धर्मपुरी येथे श्रीराम शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या श्रीराम कृषी महाविद्यालय, पाणीव येथील चतुर्थ वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या कृषी कन्यांनी ग्रामस्थांना सोबत घेऊन सहभागी प्रात्यक्षिक मूल्यावलोकन कार्यक्रमाचे आयोजन केले. सहभागी प्रात्यक्षिक मूल्यावलोकन कार्यक्रमाचा मुख्य उद्देश गावाची सर्व गरज ,समस्या, संसाधनांची माहिती ग्रामस्थ व शेतकरी यांच्याकडून समजून घेऊन त्यांना आलेल्या अनुभवाचा व प्राप्त ज्ञानाचा सर्वांगीण विकासासाठी वापर करून. वर्षभरामध्ये येणाऱ्या शेतीचे हंगाम, रोजगार आणि दुष्काळी परिस्थिती असताना पाणी टंचाई कशी दूर करता येईल याची माहिती देऊन गावामधील घरे , रस्ते, पाणी आणि अस्तित्वात असलेल्या जमिनीची स्थिती चा नकाशा तयार करणे, चर्चाकरणे, कागदावर किंवा जमिनीवर रेखाटन करून ग्रामस्थांना




याबाबत अवलोकन करण्याचे काम कृषिकन्या अनिशा पोळ ,भाग्यश्री गायकवाड, अमृता राऊत, अंकिता कोरपडे, दीक्षा केदार, अंजली जाधव, साक्षी नवगन यांनी केले.

# धाराशिव माझी कार्याध्यक्ष तनुजा हेड्डा यांची का सेवा दल प्रदेश उपाध्यक्षपदी निवड;वरिष्ठ नेत्यांचे मानले आभार

काँग्रेस पक्षातील अविरत सेवा आणि पक्षसंघटनातील उल्लेखनीय कामगिरीची




दखल घेत श्रीमती तनुजा हेड्डा यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवा दलाच्या 'प्रदेश उपाध्यक्ष' पदी निवड करण्यात आली आहे. यापूर्वी त्यांनी धाराशिव जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष म्हणून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली आहे. आपल्या या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत श्रीमती तनुजा हेड्डा यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. काँग्रेस पक्षाची विचारधारा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे आणि सेवा दलाचे संघटन अधिक मजबूत करणे हेच आपले प्राथमिक ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. नेत्यांचे मानले आभार: माझ्यावर विश्वास दाखवून ही महत्त्वाची जबाबदारी दिल्याबद्दल मी काँग्रेस पक्षाध्यक्ष मालिकार्जून खर्गे सर , प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ सर तसेचसेवादलाचे प्रदेश अध्येक्ष विलास औताडे सर,माझी प्रदेश अध्येक्ष नानाभाऊ पटोले पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेत्यांचा आणि प्रदेश सेवा दल नेतृत्वाचा मनापासून आभारी आहे. तसेच जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून काम करताना मला सहकार्य करणाऱ्या माझ्या सर्व सहकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांचे मी आभार व्यक्त करते आगामी काळात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी मी अधिक ताकदीने आणि निष्ठेने काम करेन, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# दैनिक केसरी चे जेष्ठ पत्रकार महादेव जगताप यांचे दुःखद निधन

प्रतिनिधी आनंद घळके - दैनिक केसरीचे ज्येष्ठ पत्रकार महादेव भागवत जगताप (वय -६८) यांचे गुरुवारी पहाटे सुमारे५.३० वाजण्याच्या दरम्यान अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने टेंभुर्णी सह संपूर्ण परिसरात हळहळ व व्यक्त होत आहे असून पत्रकारिता क्षेत्रात एक अनुभवी अभ्यासू आणि निर्भीड पत्रकार गमावला आहे. महादेव जगताप हे गेल्या दोन महिन्यांपासून सोलापूर येथे रुग्णालयात उपचार घेत होते. प्रकृती काहीशी सुधारणा झाल्याने बुधवारी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. त्यानंतर त्यांना घरी आणण्यात आले मात्र गुरुवारी प्रकृती अचानक त्यांची प्रकृती खालावली आणि सकाळी ५.३० वाजता च्या सुमारास त्यांची प्राणज्योत मावळली.

महादेव जगताप यांनी अनेक वर्ष दैनिक केसरीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रश्न सामाजिक विशेष शेतकऱ्यांचे अडचणी जनजासामान्याच्या समस्या प्रभावीपणे मांडल्या. संयमी स्वभाव वस्तुनिष्ठ लेखन आणि पत्रकार येथील प्रामाणिकपणा ही त्यांची ओळख होती.

त्यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या पश्चात आई,पत्नी, दोन मुले, दोन मुली, असा परिवार आहे . ते पत्रकार अनिल जगताप यांचे थोरले बंधू होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच पत्रकार सामाजिक कार्यकर्ते



राजकीय पदाधिकारी विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिक यांच्या निवासस्थानी धाव घेऊन कुटुंबियांचे सांत्वन केले. टेंभुर्णी येथे चव्हाणवाडी परिसरात शोकाकळ पसरली असून सर्व स्तरातून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. त्यांच्यावर गुरुवारी सकाळी ११.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले

# महात्मा फुले विद्यालय टेंभुर्णी येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

टेंभुर्णी ता. माढा येथील महात्मा फुले विद्यालय येथे देशाचा ८०वा स्वातंत्र्य दिन मोठ्या जल्लोषात व उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या परंपरेप्रमाणे दरवर्षीप्रमाणेच या वर्षी देखील इयत्ता दहावी एसएससी बोर्डामध्ये १००% गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक मिळवलेली विद्यार्थिनी कु. अद्या सिद्धेश्वर शिंदे व तिच्या पालकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमाला शाळेत दहावी मध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थी व पालकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याची एक अनोखी व वैशिष्ट्यपूर्ण परंपरा महात्मा फुले विद्यालयाने जपली आहे. ध्वजारोहण झाल्यानंतर गावातून विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात देशभक्तीपर घोषणा दिल्या. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची प्रभात फेरी टेंभुर्णी ग्रामपंचायतचा झेंडावंदनाचा कार्यक्रम ऐतिहासिक वेशीवर संपन्न होतो त्या ठिकाणी देखील शाळेतील विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. यामुळे कार्यक्रमाला जास्त शोभा आली. यानंतर प्रभात फेरी शाळेत दाखल झाल्यानंतर शाळेतर्फे विद्यार्थ्यांना नाष्टा व खाऊवाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांची देशभक्तीपर भाषणे, देशभक्तीवर आधारित गीत गायन, तसेच प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय यांच्यातर्फे व्यसनमुक्तीपर व्याख्यान असा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापक श्री. शुक्राचार्य भानवसे, प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सिद्धेश्वर शिंदे तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नारायण भानवसे सर, मुख्याध्यापक विजय यादव सर, मुख्याध्यापक शोएब बागवान, टेंभुर्णी व पंचक्रोशीतील सर्व प्रतिष्ठित मान्यवर, पालक वर्ग, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत



हा स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# टेल टू हेड मागणी लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित....

:डॉ.अतुल क्षीरसागर उपळाई प्रतिनिधी - आज सीना माढा उपसा सिंचन योजना टेल टू हेड प्रभावीपणे राबावी यासाठी आंदोलन माजिल्हा परिषद सदस्य भारत आबा शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्ष विनंती ताई कुलकर्णी, पंचायत समिती सदस्य बालाजी भाऊ पाटील, सरपंच डॉ संतोष दळवी यांच्या नेतृत्वात करण्यात आले. कार्यकारी अभियंता सचिन पवार साहेब यांनी सर्व आंदोलन कर्त्यांशी व्हिडिओ कॉल द्वारे संवाद साधून सर्व विषयांवर चर्चा केली.सीना माढा उपसा सिंचन योजनेचा खरीप हंगामातील आवर्तन दि.१७/०७/२०२६ पासून सुरू झाले असून सद्यस्थितीत पंपगृहातील ५ विद्युत पंप चालू झाले होते. परंतु दि.१६/०८/२०२६ रोजी एरिपीळेप गेळपीं मधील गळती मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे पंपगृह पूर्ण पणे बंद ठेवण्यात आले आहे.

सद्यस्थितीत एरिपीळेप गेळपीं व ठळींळपस चरळप ची दुरुस्तीचे काम युद्ध पातळीवर सुरु असून काम पूर्ण झाल्या नंतर आवर्तन टेल टू हेड (गोरेवाडी, उपळाई.



विठ्ठल वाडी, सोलंकरवाडी) प्रमाणे विहित विसर्ग देण्यात येईल व मागील कुठल्याही वितरिकेला आवर्तन देण्यात येणार नाही. असा कार्यकारी अभियंता सचिन पवार साहेब, उप अभियंता तुंबळ साहेब यांनी लेखी स्वरुपात आश्वासन दिले आहे.. एक महिना झाला सीना माढा उपसा सिंचन योजनेचे आवर्तन सुरु होऊन तरीपण टेल भागातील शेतकरी आजही पाण्यापासून वंचित आहे. यावेळी पंचायत समिती सदस्य पोपट तात्या अनपट, बलभीम आप्पा लोंढे,गोविंद भाऊ पवार, ज्ञानेश पवार. आकाशभैय्या पाटील, भाऊसाहेब महाडीक, विजय कोकाटे , अण्णासाहेब माने, केशव बाबा गायकवाड , बाबाराजे सावंत, सत्यवान लटके,इसाक काझी, परिसरातील सर्व शेतकरी व पत्रकार बंधू उपस्थित होते.

# युवकांनी कायद्याचे भान ठेवून अमली पदार्थ व रॅगिंगपासून दूर राहावे - न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे

सोलापूर, दि. २२ (जिमाका.) : युवकांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करण्याबरोबरच बालकांचे संरक्षण, अमली पदार्थांच्या दुष्परिणामांपासून बचाव आणि रॅगिंगसारख्या गंभीर सामाजिक व कायदेशीर समस्यांविषयी संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती आत्मसात करून जबाबदार नागरिक म्हणून समाजात सकारात्मक भूमिका बजावावी, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे सचिव तथा न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे यांनी केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्या वतीने गांधी नाथा रंगजी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, सोलापूर येथे पॉक्सो कायदा, अमली पदार्थ प्रतिबंध आणि रॅगिंगसंदर्भातील कायदे याबाबत विधी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते मार्गदर्शन करत होते.पॉक्सो कायद्याविषयी मार्गदर्शन कार्यक्रमात सोलापूर बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ड. परमानंद जवळकोटे यांनी पॉक्सो कायद्याविषयी मार्गदर्शन केले. बालकांचे लैंगिक शोषण रोखण्यासाठी कायद्यातील तरतुदी, बालकांच्या संरक्षणाची जबाबदारी तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.अमली पदार्थांचे दुष्परिणाम अमली पदार्थ प्रतिबंध या विषयावर सारथी यूथ फाउंडेशनचे सचिव रामचंद्र वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम स्पष्ट करून युवकांनी व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. रॅगिंग ही गंभीर कायदेशीर समस्या रॅगिंग : सामाजिक व कायदेशीर समस्या या विषयावर न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. रॅगिंग ही केवळ शिस्तभंगापुरती मर्यादित बाब नसून त्याचे गंभीर कायदेशीर परिणाम आयुष्यावर होऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कायद्याचे पालन करून परस्परांचा सन्मान राखावा, असे त्यांनी सांगितले.मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमास सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ड. संतोष पाटील, गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय गांधी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे रमेश रोडगीं यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्राचार्य डॉ. श्रीधर पाटील, डॉ. द्वारकादास बाहेती, डॉ. गजेंद्र लाड व डॉ. वैशाली सरवदे उपस्थित होते. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. युवकांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त असल्याचे प्राचार्य डॉ. श्रीधर पाटील यांनी सांगितले.यशस्वी आयोजन कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सचिव तथा न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे यांच्या देखरेखीखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिकारी-कर्मचारी, महाविद्यालयाचे कर्मचारी व विधी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमासाठी गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान, गांधी नाथा रंगजी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, गांधी नाथा रंगजी फार्मसी कॉलेज आणि सारथी यूथ फाउंडेशन, सोलापूर यांचे सहकार्य लाभले.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात सद्भावना दिवस आणि अक्षय ऊर्जा दिन उत्साहात संपन्न

देशाचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त दिनांक २० ऑगस्ट रोजी श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने सद्भावना दिवस आणि अक्षय ऊर्जा दिन अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या हस्ते स्वर्गीय भारतरत्न राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो स्वयंसेविका प्राजक्ता गांधले यांनी केले. सद्भावना दिवस हा राष्ट्रीय ऐक्य, शांतता, राष्ट्रीय एकात्मता आणि सर्व धर्मांमधील सलोखा वाढवण्यासाठी आणि नागरिकांमध्ये हिंसाचाराचा त्याग करून परस्पर सद्भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने पाळला



जातो. तर अक्षय ऊर्जा दिन हा देशात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, बायोगॅस आणि जलविद्युत यांसारख्या पर्यावरणपूरक आणि अपारंपरिक ऊर्जा स्रोतांच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी, तसेच जीवाश्म इंधनावरील वाढती मदार कमी करून शाश्वत विकासाचा संदेश देण्यासाठी साजरा केला जातो. त्यानंतर विद्यार्थी मनोगतामध्ये दिव्या मिस्कीन, योगिता शिंदे आणि संदेश बाचके यांनी सद्भावना दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, अक्षय ऊर्जा दिनाची संकल्पना आणि आजच्या काळातील त्याची अनिवार्यता यावर आपले विचार मांडले. तसेच किरणकुमार हाके आणि निखिल माळी या विद्यार्थ्यांनी अक्षय ऊर्जा दिनानिमित्त कौठाळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राबवलेल्या उपक्रमाचा आपला प्रेरणादायी स्वानुभव उपस्थित विद्यार्थ्यांसमोर व्यक्त करून उत्स्फूर्त दाद मिळवली. यावेळी प्राध्यापकांच्या मनोगतामध्ये प्रा. प्रिती कांबळे यांनी अक्षय ऊर्जेचे तांत्रिक महत्त्व, ऊर्जेचे विविध प्रकार, ऊर्जा संवर्धनाचे विविध उपाय तसेच राजीव गांधी यांचे प्रेरणादायी जीवनचरित्र आणि सद्भावना दिवस साजरा करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अजित कुरे यांनी सामाजिक दृष्टिकोनातून सद्भावना दिवसाची संकल्पना मांडत अक्षय ऊर्जेचा सुयोग्य वापर करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज असल्याचे अधोरेखित केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांनी सद्भावना दिनाची खरी व्याख्या सांगत सामाजिक शांतता आणि ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी त्याचे महत्त्व विशद केले. विद्यार्थी दशेत सद्भावना हाच खरा चरित्रसंपन्न दागिना असल्याचे सांगत त्यांनी अक्षय ऊर्जा दिनानिमित्त ऊर्जा संवर्धन आणि त्याचे जतन याविषयी देखील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात रासेयो स्वयंसेवक संदेश बाचके याने उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना सद्भावना दिवसाची शपथ दिली. कार्यक्रमाचा समारोप करताना प्रा. अजित कुरे यांनी उपस्थितांचे आभार मानले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेविका वैष्णवी बारंगुळे यांनी केले. सदरील कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या सोहळ्यात प्रा. नम्रता गोरे, प्रा. कल्पना मिटकरी, प्रा. संकेत बिराजदार यांच्यासह महाविद्यालयातील द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते मंगळवेढा नगरपालिका शाळा क्रमांक ५ च्या नूतन इमारतीचे उद्घाटन

मंगळवेढा, दि. २१ (जिमाका.)



: नगरपालिकेच्या शाळांमधूनच उद्याचे जबाबदार, संस्कारक्षम आणि गुणवंत नागरिक घडतील, अशी देखणी आणि सुंदर इमारत आज या ठिकाणी बांधण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या शाळेचा कायापालट करणारे आमदार समाधान अवताडे हेच या शाळेचे विद्यार्थी आहेत, ही कौतुकाची गोष्ट आहे. ज्या नगरपालिकेच्या शाळेत त्यांनी शिक्षण घेतले आणि ज्या शिक्षकांनी त्यांना घडवले, त्या सर्व शिक्षकांचा आज या समारंभात सन्मान करण्यात आला. हे विद्यार्थ्यांसाठी भविष्यात काहीतरी करून दाखवण्याची प्रेरणा देणारे आहे, असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी केले. मंगळवेढा येथील नगरपालिकेच्या शाळा क्रमांक ५ च्या नूतन इमारतीचे उद्घाटन विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांच्या हस्ते आज पार पडले. यावेळी जिल्हा परिषद सदस्या सौ. करुणा शिवशरण, पंचायत समिती सभापती दीपाली ताड, नगराध्यक्षा सुनंदा अवताडे, उपनगराध्यक्ष येताळ भगत, सार्वजनिक बांधकाम सभापती गौरीशंकर गुरुकुल, तहसीलदार मदन जाधव, मुख्याधिकारी सुरेश भदर, नगर अभियंता प्रशांत सोनटक्के आदी मान्यवरांसह अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र होणार आशियातील सर्वात मोठे डेटा सेंटर - विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर

## युवा पिढी विकसित भारताचा पाया : नार्वेकर

पंढरपूर, दि. २१ : आजचा युवक तंत्रज्ञानाच्या बळावर पुढे जात आहे. युवा पिढी हाच विकसित भारताचा पाया आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण घेऊन त्याचा योग्य वापर केला, तर केवळ आपले राज्यच नाही तर देशाचीही प्रगती होणार आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात डेटा सेंटर उभारण्यात येणार असून, येत्या काळात महाराष्ट्र आशियातील सर्वात मोठे डेटा सेंटर बनणार आहे. जगातील अनेक देशांचा डेटा सुरक्षित ठेवण्याचे काम महाराष्ट्र करेल, असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी केले. पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर येथील स्वेरी महाविद्यालयात ज्ञान, तंत्रज्ञान आणि युवाशक्तीच्या माध्यमातून विकसित महाराष्ट्राची निर्मिती या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार समाधान आवताडे, विधानसभा सल्लागार ड. संदीप केकाणे, महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना विधानसभा अध्यक्ष नार्वेकर म्हणाले, पंढरपूर ही श्रद्धेची, ज्ञानाची आणि शेतीची भूमी आहे. याच पंढरपुरात आता तंत्रज्ञानाची नवी पिढी घडत आहे. तंत्रज्ञानाच्या बळावरच भारताने चंद्रावर झेप घेतली आहे. देशात महाराष्ट्र हे औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर राज्य आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात ३० लाख कोटींची गुंतवणूक आणली आहे.

एआयमुळे जीवन जितके सोपे झाले आहे, तितकेच पुढील काळात टिकून राहण्यासाठी एआय आत्मसात करणे गरजेचे आहे. एआयचा वापर प्रत्येक क्षेत्रात होत आहे. नव-नवीन तंत्रज्ञान येत आहे. भारताच्या अपेक्षा गगनाला भिडल्या आहेत आणि त्या तंत्रज्ञानाशिवाय पूर्ण करणे अशक्य आहे. कोणताही देश यशस्वी करायचा असेल तर सरकारसोबत लोकांचा सहभागही महत्त्वाचा आहे. लोकशाहीत संविधानिक पद्धतीने विचार व्यक्त करणे महत्त्वाचे आहे. विरोध करा, पण तो संविधानाने दिलेल्या तरतुदींनुसार असावा.कार्यक्रमात त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शिक्षणाबाबत माहिती जाणून घेतली.युवा शक्ती देशाचा विद्यार्थी हा देशाचा आणि राज्याच्या विकासाचा पाया आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेतले पाहिजे. नालंदा विद्यापीठ आज जिवंत असते तर भारत जगात प्रथम क्रमांकावर राहिला असता. ज्ञान, तंत्रज्ञान



आधारस्तंभ : आमदार आवताडे यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले, ज्ञान, तंत्रज्ञान आणि युवाशक्तीचा योग्य ताळमेळ झाला तर जगाच्या इतिहासात महाराष्ट्र प्रथम क्रमांकाचे राज्य बनेल. तंत्रज्ञानाच्या जोरावर राज्याची प्रगती झाली आहे. युवा शक्ती हा देशाचा आधारस्तंभ आहे. आणि युवाशक्तीच्या जोरावर महाराष्ट्र जगात अग्रेसर बनेल. याप्रसंगी स्वेरी महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी महाविद्यालयाची पार्श्वभूमी सांगून महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीची आणि महाविद्यालयात संशोधनासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

# भारतामधील पहिली उपेक्षित महिला पैलवान : राही सोमवंशी.

राही पैलवान ! होय राही... ही होती भारतामधील पहिली महिला पैलवान. राहीबाई रामभाऊ सोमवंशी हे तिचे पूर्ण नाव.आणि सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर हे तिचे मुळ जन्मगाव.पंढरपुरातील मातोश्री सखुबाई कन्या प्रशालेचे माजी मुख्याध्यपक श्री.जीवन पाटील सर यांनी राही च्या जीवनावर कादंबरी लिहिली नसती तर राही पैलवानची कहाणी कायम उपेक्षित राहिली असती. ज्या काळात स्त्रीने चूल आणि मुल या गोष्टीचा घराचा उंबरठा ही ओलांडायची परवानगी समाज देत नव्हता.अशा काळात मराठा कुटुंबात जन्माला येवून राही पैलवान यांच्या काळात पुरुष पैलवानांना बरोबर कुस्त्या खेळात होती.नुसती कुस्त्या खेळत नव्हती तर पुरुषांना चितपट करत होती. राहीने पुरुषांच्या बरोबरीने त्या काळातील कोल्हापूरची मैना,बडोद्याची हरणी,हैदराबादची गुलशन बानू यांच्या शिवाय हैदराबादचीच हमीदा बानू हिला १९३३ साली सोलापुरात चितपट करून आपल्या नावाचा डंका थेट इंग्लंड पर्यंत वाजवला होता. परंतु,महाराष्ट्रातील लोकांनी तिची म्हणावी तशी दखल घेतली नाही.तिचे जिवंतपणी प्रचंड हाल झालेच,परंतु तिच्या मृत्यू नंतर ही तिची अपेक्षा थांबली नाही. राही पैलवानच्या वाट्याला आलेली अपेक्षा तिच्या मरणानंतर ही संपण्याचे नाव घेत नाही.श्री.जीवन पाटील सरांनी तिच्या सत्य जीवनावर कांदबरी स्वरूपात चरित्र लिहिले खरे ! परंतु,प्रकाशनाने फसवणूक केली आणि हाती दिली केवळ एक प्रत.सरांनी केस केली, कोर्ट कचेऱ्या केल्या. केस जिंकली ! परंतु,पैशा अभावी राहीचे चरित्र लोकांपर्यंत पोहचवायचे राहिले ते राहिलेच. आपल्या मराठामोळ्या मातीमधील राही पैलवानची हिच चरित कहाणी आता पुन्हा नव्याने प्रकाशित करण्याचा आणि लोकांपर्यंत पोहचण्याचा



आम्ही संकल्प केला आहे. त्यासाठी आपण ही सढळ हाताने मदत करू शकता. आपण मदत कधी आणि कोठे करावयाची आहे.हे आम्ही आपणाला लवकरच कळवू !

# बार्शीचे कर्तव्यदक्ष तहसीलदार एफ. आर. शेख यांची उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नती

बार्शी प्रतिनिधी :

(राज्यश्री गवळी ): सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत महसूल प्रशासनात शिस्त, पारदर्शकता आणि तत्परतेचा आदर्श निर्माण करणारे बार्शीचे तहसीलदार एफ. आर. शेख यांची उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या पदोन्नतीमुळे बार्शी तालुक्यातील नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कर्तव्यनिष्ठ आणि संवेदनशील अधिकारी म्हणून निर्माण केलेली ओळख हीच त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीतील मोठी जमेची बाजू मानली जात आहे. तहसीलदार म्हणून बार्शी येथे कार्यरत असताना एफ. आर. शेख यांनी प्रशासन आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्यावर विशेष भर दिला. महसूल विभागाशी संबंधित विविध प्रश्न, नागरिकांच्या अडचणी, शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच प्रशासकीय कामकाजात तत्परता आणि जबाबदारीची भूमिका त्यांनी सातत्याने जपली. त्यामुळे त्यांच्या कार्यशैलीची बार्शी तालुक्यात वेगळी छाप निर्माण झाली. अधिकारी म्हणून केवळ कार्यालयीन कामकाजापुरते मर्यादित न राहता नागरिकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची त्यांची भूमिका अनेकांच्या लक्षात राहिली. महसूल प्रशासन हे थेट सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेले असल्याने या विभागात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याची कार्यपद्धती महत्त्वाची ठरते. या पार्श्वभूमीवर एफ. आर. शेख यांनी नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याला प्राधान्य दिले. शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, प्रशासनातील शिस्त कायम राखणे आणि कामकाजात पारदर्शकता ठेवणे,



Dainik.Rajaswa @dainik_rajaswa dainik.rajaswa Dainik Rajaswa News

सायंदैनिक राजस्व



# स्टेट बँक ऑफ इंडियाचा मोठा निर्णय, BSBD खात्यातून पैसे काढण्याचा नियम बदलला, मोफत व्यवहारांनंतर १५ रुपये शुल्क घेणार

येत्या २२ ऑगस्ट रोजी 'छात्रो की गुंज' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या




कार्यक्रमासाठी अद्याप पोलिसांनी आम्हाला परवानगी दिलेली नाही. मात्र पोलिसांनी परवानगी दिली किंवा नाही, तरी हा कार्यक्रम होणारच, अशी भूमिका काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी घेतली होती. त्यांनी बुधवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना याबाबत माहिती दिली. त्यांच्या या भूमिकेनंतर आता पुण्यातील काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक होण्याची शक्यता होती. यानंतर पोलीस राहुल गांधी यांच्या या कार्यक्रमाला परवानगी नाकारणार की अगदी शेवटच्या क्षणी परवानगी देऊ करणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. अखेर पुणे पोलिसांनी काहीवेळापूर्वीच राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाला कायदेशीर परवानगी देऊ केली आहे. काही अटी व शर्ती टाकत पुणे पोलिसांकडून राहुल गांधी यांच्या 'छात्रो की गुंज' या कार्यक्रमाला परवानगी देण्यात आल्याचे समजते. 'छात्रो की गुंज' कार्यक्रमात राहुल गांधी विशेषतः मुलींशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाला सुमारे ८ ते १० हजार मुली उपस्थित राहण्याची शक्यता आहे. पुणे हे मुलींच्या पहिल्या शाळेचे शहर आहे. त्यामुळे या ऐतिहासिक शहरात राहुल गांधी मुलींशी थेट संवाद साधणार आहेत. राज्यभरातून मुली या कार्यक्रमासाठी नोंदणी करत आहेत. मोठ्या संख्येने मुली पुण्यात येऊन या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. पेपर लीक, विद्यार्थ्यांच्या हक्कांची लढाई, मुली आणि महिलांवरील वाढते अत्याचार, अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर राहुल गांधी मुलींशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे मुलींना राहुल गांधींना थेट प्रश्न विचारण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी मुलांसाठीही जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र राहुल गांधी यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधी प्रामुख्याने मुलींना देण्यात आली आहे. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यपद्धतीवरही प्रशांत जगताप यांनी टीका केली. विरोधकांना सातत्याने टार्गेट केले जात असून, 'छात्रो की गुंज' कार्यक्रमालाही विविध अडचणी निर्माण केल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला होता. पुणे पोलिसांच्या कारवाईवरही प्रशांत जगताप यांनी प्रश्न उपस्थित केले. अस्तित्वात नसलेल्या किंवा अद्याप अंमलात न आलेल्या कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आणि अखेर न्यायालयाच्या आदेशानंतर ते गुन्हे मागे घेण्याची वेळ आली, ही पुणे पोलिसांसाठी लाजिरवाणी बाब असल्याची टीका त्यांनी केली.

# इम्रान हाश्मीची जादू चालली, 'आवारापन २' ने पहिल्या आठवड्यात धुमाकूळ घातला

नितिन कक्कर दिग्दर्शित रोमँटिक ॲक्शन ड्रामा फिल्म 'आवारापन २' (रीरिप २) या सिनेमाची सध्या प्रेक्षकांमध्ये क्रेझ पाहायला मिळत आहे. अभिनेता इम्रान हाश्मी अभिनीत या सिनेमाने अवघ्या काही दिवसांत १०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे. प्रदर्शनाच्या अवघ्या एका आठवड्यातच या सिनेमाने आपल्या बजेटच्या दुप्पट कमाई करुन सुपरहिटचा टॅग मिळवला आहे. १४ ऑगस्ट रोजी 'आवारापन २' हा सिनेमा रिलीज झाला होता. हा चित्रपट रिलीज होऊन ८ दिवस पूर्ण झाली आहेत. आता या सिनेमाने ८ व्या दिवशी, म्हणजेच दुसऱ्या शुक्रवारी किती कोटींचं कलेक्शन केलं? जाणून घेऊयात. अशीच चांगली राहिली, तर तो ब्लॉकबस्टर ठरु शकतो. 'आवारापन २' या सिनेमाच्या कमाईबाबत बोलायचं झाल्यास, 'आवारापन २' या सिनेमाने प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी २२ कोटी रुपयांची कमाई केली होती. या सिनेमाने पहिल्या आठवड्यात ११३.५० कोटी रुपयांची कमाई केली. पहिल्याच आठवड्यात या सिनेमाने १०० कोटींचा टप्पा ओलांडला. सॅकनिल्कच्या अर्ली ट्रेंड रिपोर्ट्सनुसार, 'आवारापन २' या सिनेमाने प्रदर्शनाच्या आठवड्या दिवशी म्हणजेच दुसऱ्या शुक्रवारी ५.५० कोटी रुपयांची कमाई केली. यामुळे 'आवारापन २' या सिनेमाने भारतात एकूण ८ दिवसांत ११९ कोटी रुपयांचे




'आवारापन २' या सिनेमाने अवघ्या ८ दिवसांत किती कोटी कमावले? इम्रान हाश्मी अभिनीत 'आवारापन २' हा चित्रपट १४ ऑगस्ट रोजी प्रेक्षकांच्या भेटीस आला होता. सुरुवातीला या सिनेमाला प्रेक्षकांकडून जबरदस्त प्रतिसाद मिळाला. 'आवारापन' या कल्ट क्लासिक सिनेमाचा हा सिक्वेल असून, 'आवारापन' या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर प्रेक्षकांकडून हवा तसा प्रतिसाद मिळालेला नव्हता. परंतु, टेलिव्हिजनवर रिलीज होताच, या सिनेमाला प्रेक्षकांकडून पसंती मिळाली. दरम्यान, या सिनेमाच्या दुसऱ्या पार्टला प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. इम्रान हाश्मीच्या कारकिर्दीतील हा सर्वाधिक कमाई करणारा सिनेमा ठरला आहे. जर 'आवारापन २' या सिनेमाची कामगिरी नेट कलेतक्शन केलं आहे. 'आवारापन २' या सिनेमाने प्रदर्शनाच्या ८ दिवसांत ११९ कोटी रुपयांची कमाई केली आहे. सध्या अक्षय कुमारच्या 'वेलकम टू द जंगल' या सिनेमाचे लाईफटाईम कलेक्शनला मागे टाकण्याचे 'आवारापन २' या सिनेमाचे लक्ष्य आहे. यासाठी 'आवारापन २' या सिनेमाला आणखी ८ कोटींची कमाई करणं आवश्यक आहे. दरम्यान, हा सिनेमा लवकरच हा टप्पा ओलांडेल. काही दिवसांत यशचा 'टॉक्सिक' हा सिनेमा रिलीज होणार आहे. 'टॉक्सिक' प्रदर्शित होईपर्यंत, 'आवारापन २' ला कोणत्याही अडथळ्याशिवाय मोठी कमाई करण्याची संधी आहे. 'आवारापन २' हा सिनेमा २०० कोटी रुपयांची कमाई करेल का? हे पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे.

# चक्क AI ने बनवला नवा व्हायरस

आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात एआय आता केवळ माहिती तंत्रज्ञान आणि कोडिंगपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर त्याने थेट जीवशास्त्राच्या क्षेत्रात प्रवेश केला आहे. अमेरिकेतील जगप्रसिद्ध स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी आणि आर्क इन्स्टिट्यूटच्या संशोधकांनी एआयच्या मदतीने निसर्गात अस्तित्वात नसलेले पूर्णपणे नवीन व्हायरस तयार केले आहेत. या ऐतिहासिक संशोधनामुळे वैद्यकीय क्षेत्रात उपचारांच्या नव्या आशा निर्माण झाल्या असल्या, तरी भविष्यातील सुरक्षेबाबत जगाची चिंता वाढली आहे. संशोधकांनी स्पष्ट केले आहे की, एआयने डिझाइन केलेले हे व्हायरस मानवी शरीराला संक्रमित करणारे नाहीत. हे प्रामुख्याने 'बॅक्टेरियोफेज' आहेत. म्हणजेच केवळ बॅक्टेरियांना संक्रमित करून नष्ट करणारे विषाणू. प्रयोगशाळेतील चाचण्यांमध्ये या एआय-डिझाइन केलेल्या जीनोम असलेल्या व्हायरसने औषध-प्रतिरोधक असलेल्या ए. लेश्रळ सारख्या प्राणघातक बॅक्टेरियांनाही यशस्वीरीत्या नष्ट केले. त्यामुळे भविष्यात औषधांना दाद न देणाऱ्या 'सुपरबग' आणि संसर्गांवर प्रभावी उपचार करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा मोठा उपयोग होऊ शकतो.

ख तळींीः वैद्यकीय क्षेत्रासाठी आशेचा किरण

सध्या जगभरात अँटिबायोटिक रेझिस्टन्सची मोठी समस्या निर्माण झाली आहे. अनेक सामान्य औषधे आता बॅक्टेरियांवर परिणाम करत नाहीत. अशा वेळी एआयच्या माध्यमातून विशिष्ट बॅक्टेरियांना शोधून मारणारे कृत्रिम व्हायरस तयार करणे हे वैद्यकीय शास्त्रातील एक क्रांतिकारी पाऊल मानले जात आहे.



बायोसेफ्टी आणि सुरक्षेबाबत जगभरात चिंता

एकीकडे या यशामुळे आनंद व्यक्त होत असताना, दुसरीकडे जैवसुरक्षा तज्ज्ञांनी यावर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. एआयच्या साहाय्याने संपूर्ण व्हायरस जीनोम डिझाइन करण्याची क्षमता आता प्रत्यक्षात आली आहे. भविष्यात या तंत्रज्ञानाचा गैरवापर करून मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरणारे जैविक घटक किंवा जैविक शस्त्रे तयार केली जाऊ शकतात का? असा प्रश्न बायोसेफ्टी तज्ज्ञांकडून उपस्थित केला जात आहे. एआयची ही अभूतपूर्व झेप एकाच वेळी मानवी वैद्यकीय उपचारांसाठी मोठा आशेचा किरण ठरू शकते, तर दुसरीकडे संपूर्ण जगाच्या जैवसुरक्षेसाठी एक मोठा इशारा ठरू शकतो.

# नवीन सिम कार्डसाठी आता बायोमेट्रिक केवायसी प्रणाली लागू

मोबाईल नेटवर्कद्वारे होणारे बनावट सिम कार्ड, ओळख चोरी आणि फसवणूक रोखण्यासाठी, सरकारने वापरकर्त्याच्या ओळख पडताळणीचे नियम अधिक कडक केले आहेत. दूरसंचार (वापरकर्ता ओळख) नियम, २०२६ अंतर्गत, नवीन सिम किंवा मोबाईल कनेक्शन खरेदी करताना बायोमेट्रिक केवायसी प्रणाली लागू करण्यात आली



आहे. संबंधित नियम दूरसंचार विभागाच्या (उद्द) पोर्टलवर उपलब्ध झाले आहेत.

नवीन सिम कार्डसाठी काय बदलले?

नवीन सिम कार्ड किंवा मोबाईल कनेक्शन खरेदी करताना ग्राहकांची बायोमेट्रिक ओळख आवश्यक असेल. आधार असलेल्या ग्राहकांसाठी ई-केवायसी प्रणाली लागू असेल. ज्या ग्राहकांकडे आधार-आधारित केवायसी नाही, त्यांच्यासाठी डी-केवायसी प्रक्रिया अवलंबली जाईल. सिम कार्ड खऱ्या व्यक्तीच्या ओळखीनेच जारी केले आहे, याची पडताळणी करण्यासाठी हे आहे.

# 'या' लोकांचा आता टोल कट होणार नाही; NHAI ने आणला विशेष पास, कसा मिळवता येईल?

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आपल्या डिजिटल लोकल पास सेवेचा विस्तार केला आहे. ही सेवा आता देशभरातील १२१ टोल प्लाझांवर उपलब्ध होईल. या सेवेचा लाभ घेऊन, टोल प्लाझाजवळ राहणारे रहिवासी मासिक पास मिळवू शकतात, ज्यामुळे त्यांना वारंवार टोल भरण्याची गरज भासणार नाही. पात्र वापरकर्ते 'हायवे यात्रा' ॲपद्वारे हा पास मिळवू शकतात. यामुळे टोल प्लाझामधून जाण्यासाठी टोल भरण्याची गरज भासणार नाही. वापरकर्त्यांना फक्त एक निश्चित रक्कम भरावी लागेल.

हा पास कोणासाठी आहे?

टोल प्लाझाच्या २० किलोमीटरच्या परिघात राहणारे लोक या डिजिटल टोल पाससाठी अर्ज करू शकतात. हा पास केवळ गैर-व्यावसायिक वाहनांसाठी वैध असेल. संपूर्ण पडताळणी प्रक्रिया ऑनलाइन असेल. पत्त्याचा तपशील 'डिजीलॉकर' वापरून निश्चित केला जाईल, वाहनाची माहिती 'वाहन' डेटाबेसद्वारे व्हेरिफाय केली जाईल आणि जोडलेल्या 'फास्टॅग'च्या तपशिलाची पडताळणी केली जाईल. यापूर्वी, प्रवाशांना टोल प्लाझावर जाऊन प्रत्यक्ष कागदपत्रे सादर करावी लागत होती. आता, ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पूर्ण केली जाऊ शकते. यासाठी तुम्ही हायवे यात्रा प ॲप वापरू शकता.

तुम्हाला किती पैसे द्यावे लागतील?

राष्ट्रीय महामार्ग वापरकर्ता शुल्क नियमांनुसार, या लोकल पाससाठी ₹३५० शुल्क आकारले जाईल. हे शुल्क गैर-व्यावसायिक वाहनांना लागू आहे. टोल नाक्यावर मंजुरीसाठी पास आवश्यक आहे. यामुळे पात्र प्रवाशांना टोल प्लाझामधून सहजपणे जाता येईल. डिजिटल लोकल पासची अंमलबजावणी हे मल्टी-लेन फ्री फ्लो आणि बॅरियर-लेस टोलिंग प्रणालीच्या दिशेने आणखी एक पाऊल आहे. या प्रणालीअंतर्गत, प्रवाशांना टोल प्लाझावर थांबण्याची गरज भासणार नाही. चक्रक्र ची अंमलबजावणी सर्वप्रथम जुलै २०२६ मध्ये दिल्लीतील मुंडका-बक्करवाला टोल प्लाझा येथे करण्यात आली होती. आता, ही सुविधा सहा ठिकाणी उपलब्ध चोर्यासी, मुंडका, दौलतपुरा, घराऊंडा, मनोहरपूर आणि शाहजहानपूर. या भागांजवळ



राहणाऱ्या अनेक रहिवाशांना टोल न भरल्याबद्दल ई-नोटिसा मिळत होत्या. या टोल नाक्यांवर कोणीही उपस्थित नसल्यामुळे स्थानिक रहिवाशांना अडचणी येत होत्या. या समस्येवर उपाय म्हणून डिजिटल स्थानिक पास जारी करण्यात आले आहेत.

# तब्बल २ हजार १३४ कोटींचा महाघोटाळा; १६ कंपन्यांशी संगनमत करून निधी थेट परदेशात पाठवला

उदगीरमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. विविध १६ कंपन्यांशी संगनमत करीत उदगीर येथील एका व्यक्तीने तब्बल २ हजार १३४ कोटी ७९ लाख ४३ हजार ७३० रुपयांचा प्रचंड आर्थिक फसवणुक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. याबाबत रात्री उदगीर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने लातूर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, उदगीर शहरात गेल्या तीन दिवसांपासून आयकर विभागाच्या विविध पथकांकडून चौकशी सुरू होती. या चौकशीतून अखेर हा म हायोटाळा समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उदगीरमधील मोंढा भागात चौकशीसाठी आयकर विभागाचे पथक तीन दिवसापासून ठाण मांडून आहे. तपासानंतर पथकातील अधिकारीही हा प्रकार पाहून चक्रावून गेले. हा महायोटाळा असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्यांनी उदगीर शहर पोलिस ठाण्यात रात्री उशिरा फिर्याद दिली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील उपआयकर विभागाचे संचालक दीपक कुमार यांनी या संदर्भात तक्रार दाखल केली आहे.

१६ कंपन्यांनी संगनमत करून हा योटाळा, परदेशात निधी पाठवण्याच्या व्यवहाराची खोटी आणि बनावट प्रमाणपत्र दरम्यान, या प्रकरणी श्याम शिवप्रसाद कलानी याच्यासह इतर १६ कंपन्यांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३२४, २२१ आणि ३(५) अंतर्गत फसवणूक आणि अफरातफरीचा गुन्हा दाखल केला आहे. श्याम शिवप्रसाद कालानी याने १६ कंपनींना संगणमत करून हा योटाळा केला आहे. तर यात परदेशी निधी पाठवण्याच्या व्यवहाराची खोटी आणि बनावट प्रमाणपत्र तयार केली आहेत. चुकीच्या पद्धतीचा वापर करून आर्थिक लाभाच्या हेतूने निधी परदेशी पाठवण्यास मदत केल्याचं बोललं जात आहे. तर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात येता लातूरचे पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांनी या




योटाळ्याचा तपास लातूरच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवला आहे. एकंदरीत या प्रकरणानंतर लातूर शहरात एकच खळबळ उडाली आहे. ग्रामीण पोलीस ठाण्यासमोरच दोन गटांत हाणामारी; पोलिसांचा वेळीच हस्तक्षेप उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या अगदी समोरच रात्री पैशांच्या देवाणघेवाणीवरून दोन गटांत जोरदार हाणामारी झाली. काही दिवसांपासून सुरू असलेल्या पैशांच्या व्यवहाराच्या वादातून शाब्दिक बाचाबाची झाली आणि त्यानंतर दोन्ही गट एकमेकांवर धावून गेले. यात सहभागी असलेल्या महिलाही जखमी झाल्या आहेत. घटना पोलीस ठाण्यासमोरच घडल्याने पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून दोन्ही गटांना वेगळे केले. त्यामुळे परिस्थिती अधिक चिघळण्यापासून रोखण्यात आली. या प्रकरणी पैशांचा नेमका व्यवहार आणि हाणाम ारीत सहभागी व्यक्तींबाबत पोलिसांचा तपास सुरू आहे.

# ई-बाईक खड्ड्यातून उसळली, अंजली थेट दुभाजकावर आदळली

नागपुरात एक भीषण अपघाताची घटना घडली असून यात एका तरुणीचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. नागपूरच्या कामठी मार्गावर ई-बाईक अनियंत्रित होऊन तरुणी दुभाजकावर आदळली. तेवढ्यात मागून येणाऱ्या बसच्या चाकाखाली आल्याने तरुणीचा जागीच मृत्यू झाला आहे. अंजली पांडे असे या तरुणीचं नाव असून अंजली रस्त्यावर कोसळल्यानंतर मागून आलेल्या मनपाच्या इलेक्ट्रिक बसखाली ती आली. दुर्दैवाने तिचा जागीच मृत्यू झाला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सायोना पब्लिक स्कूलसमोर शुक्रवारी हा भीषण अपघात झाला आहे. रस्त्याचे बांधकाम सुरू असल्याने एकाच मार्गावरून दोन्ही दिशांची वाहतूक सुरू होती. दरम्यान, याच मार्गावरील खड्ड्यामुळे दुचाकीचा तोल गेला आणि अपघात झाला, असा प्राथमिक अंदाज आहे. या प्रकरणी कपिलनगर पोलिसांनी मनपाच्या बसचालकाला ताब्यात घेतलंय. तर अपघात नेमका खड्ड्यांमुळे झाला की अन्य कारणामुळे, याचा सध्या पोलिसांकडून तपास सुरू आहे. मात्र या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून रस्त्यांवरील खड्ड्यांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

# लेकाच्या सहाव्या वाढदिवसाला ऑर्केस्ट्रा ठेवला अन् त्याच कार्यक्रम त भरधाव बस घुसली, बापासह पाच जणांचा चिरडून जीव गेला

मुलाच्या सहाव्या वाढदिवसाला आर्केस्ट्राचा कार्यक्रम ठेवला असताना त्या कार्यक्रमामध्येच ट्रकशी टक्कर टाळण्याच्या नादात भरधाव बस घुसून बापासह पाच जणांचा करुण अंत झाल्याची धक्कादायक घटना घडली. रस्त्याच्या कडेलाच घराच्या दारात हा आर्केस्ट्राचा कार्यक्रम सुरू होता. आर्केस्ट्राच्या कार्यक्रमामध्येच भरधाव बस घुसल्याने पाच जणांचा मृत्यू होऊन १२ जण जखमी झाले. ही घटना बिहारमधील बेतियाम ध्ये झाली. बहादुर महतो, संजय कुमार, भोला दुबे, देवेंद्र दुबे आणि चांगुर राम अशी मृतांची नावे आहेत.बसवरील नियंत्रण सुटले आणि कार्यक्रमात घुसली

मिळालेल्या माहितीनुसार, देवेंद्र दुबे यांच्या मुलाचा सहावा वाढदिवस होता. या वाढदिवसासाठी आर्केस्ट्राचा कार्यक्रम ठेवल्याने मोठ्या प्रमाणामध्ये नातेवाईकांसह मित्रपरिवार जमला होता. शुक्रवारी रात्री एक प्रवासी बस गोरखपूरहून बेतियाकडे जात होती. बेतिया-बागा-लौरिया मुख्य मार्गावर भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकसोबतची टक्कर टाळण्याच्या नादात बसवरील नियंत्रण सुटले आणि ती रस्त्याच्या कडेला सुरू असलेल्या आर्केस्ट्राच्या कार्यक्रमामध्ये घुसली. त्यावेळी वाढदिवसाच्या कार्यक्रमानिमित्त मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते आणि त्यामध्येच बस



घुसल्याने एकच आक्रोश सुरू झाला. स्थानिकांनी तत्काळ बचाव आणि मदतकार्य सुरू केले. माहिती मिळाल्यानंतर पोलीससुद्धा घटनास्थळी दाखल झाले आणि मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले.

# सत्ताधारी नगरसेविकेच्या विनयभंग तक्रारीमुळे कोल्हापुरात खळबळ

कोल्हापुरात सत्ताधारी महायुतीच्या महिला नगरसेविकेसोबत विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेनंतर कोल्हापुरात राजकीय वर्तुळाम ध्ये एकच खळबळ उडाली आहे. संबंधित महिला नगरसेविकेने जुना राजवाडा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. नगरसेविकेने



तक्रार दाखल केल्यानंतर त्या संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आल्याची माहिती जुना राजवाडा पोलिसांनी दिली आहे. दरम्यान, नगरसेविकेने दिलेल्या तक्रारीनुसार संबंधित व्यक्ती सातत्याने अश्लील शिवीगाळ करून धमकी देत असल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. रात्रीच्या वेळी कचऱ्याचे ढीग पाहण्यासाठी 'सोबत चल, अन्यथा म ाझ्यासोबत फोटो काढ' असा आग्रह धरल्याचा सुद्धा तक्रारीम ध्ये उल्लेख करण्यात आला आहे. दरम्यान, सत्ताधारी नगरसेविकेच्या विनयभंग तक्रारीमुळे कोल्हापूरमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

# ISRO कडून ऑर्डर मिळताच संरक्षण आणि एरोस्पेस पेनी स्टॉकला अप्पर सर्किट

मुंबई : भारतीय इक्विटी बेंचमार्क निर्देशांकांमध्ये आज वाढ झाली, बेंचमार्क निफ्टी ५० निर्देशांक ३.५० अंकांनी (०.०१ टक्के) वाढून २४,२३५.३५ वर पोहोचला. बाजाराच्या हालचालीदरम्यान, गायत्री रबर आणि केमिकल्स च्या शेअरच्या किमतीत ५ टक्क्यांनी वाढ होऊन ती रु. ५३१.२० वर पोहोचली



आणि अपर सर्किट ला स्पर्श केला, कारण कंपनीने जाहीर केले की तिने भारतीय अंतराळ संशोधन संस्था कडून एङ्गउ्च् रबरसाठी पायलट ऑर्डर मि ळवली आहे. गायत्री रबरला खड्ळ्ज कडून पायलट ऑर्डर मिळाली गायत्री रबर आणि केमिकल्स लिमिटेडला खड्ळ्ज कडून एङ्गउ्च् रबरसाठी पायलट ऑर्डर मिळाली आहे. कंपनी विशेष क्ढउ ग्रेड रबर गॅस्केट्स आणि प्रिसिजन केमि कल सोल्यूशन्स तयार करते. नवीनतम ऑर्डर कंपनीच्या उच्च-प्रिसिजन एरोस्पेस आणि अंतराळ अन्वेषण क्षेत्रातील औपचारिक प्रवेशाचे चिन्हांकित करते. पायलट ऑर्डर अंतर्गत, कंपनी उच्च-कार्यक्षमता विशेष इलास्टोमेरिक घटक पुरवेल जे स्पेस-ग्रेड अनुप्रयोगांसाठी आवश्यक असलेल्या थर्मल, वातावरणीय आणि विश्वासार्हतेच्या मानकांची पूर्तता करण्यासाठी अभियांत्रिकी केलेले आहेत एरोस्पेस आणि संरक्षण अनुप्रयोगांवर लक्ष केंद्रितकंपनीने सांगितले की खड्ळ्ज सोबतची भागीदारी 'मेक इन इंडिया' मिशनशी सुसंगत आहे आणि त्यांच्या तांत्रिक क्षमतांचे सत्यापन करते. या विकासामुळे संरक्षण, एरोस्पेस आणि महत्त्वपूर्ण अभियांत्रिकी क्षेत्रांमध्ये त्यांचे पाय रोवण्याची पायाभरणी होते..

# शेअर बाजारात 'देसी दम'! म्युच्युअल फंड, किरकोळ गुंतवणूकदारांचा दबदबा वाढला

भारतीय शेअर बाजारात आता सर्वसामान्य आणि देशांतर्गत गुंतवणूकदारांचीच




चलती असल्याचं ताज्या आकडेवारीतून समोर आलं आहे. जून २०२६ च्या अखेरच्या तिमाहीत देशांतर्गत म्युच्युअल फंडांच्या (डीएमएफ) मालकीने सलग बाराव्या तिमाहीत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. डीएमएफ आणि सर्वसामान्य गुंतवणूकदारांची मालकी थेट विक्रमी उच्चांकावर पोहचली असून यात परदेशी गुंतवणूकदारांना मागे टाकण्यात आल्याचे जून २०२६च्या तिमाही अहवालातून समोर आलं आहे. विक्रमी गुंतवणूक, सलग २१ व्या तिमाहीत निव्वळ ओघ आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत (क्यू१ एफवाय२७) देशांतर्गत म्युच्युअल फंडांनी विक्रमी १.४२ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केली, जी सलग २१ व्या तिम ाहीतील निव्वळ ओघ ठरली. पद्धतशीर गुंतवणूक योजनांच्या (एसआयपी) माध्यमातून किरकोळ गुंतवणूकदारांचा सहभाग कायम राहिल्याने या मजबुतीला बळ मिळाले. क्यू१ एफवाय२७ मध्ये एसआयपीद्वारे सरासरी मासिक गुंतवणूक ३१,२८३ कोटी रुपयांवर पोहोचली, जी तिमाही तुलनेत १.० टक्क्यांनी आणि वार्षिक तुलनेत १६.५ टक्क्यांनी अधिक आहे. एनएसई सूचिबद्ध कंपन्यांमधील हिस्सा ११.६ टक्क्यांवर याचा परिणाम म्हणून एनएसई सूचिबद्ध कंपन्या, निफ्टी ५० आणि निफ्टी ५०० मध्ये डीएमएफ मालकी अनुक्रमे ३५ बेसिस पॉइंट्स (गेल्या तीन वर्षांत +३ टक्के गुंतवणुकीची वाढ), ५१ बेसिस पॉइंट्स आणि २८ बेसिस पॉइंट्सने वाढून विक्रमी ११.६ टक्के, १४.६ टक्के आणि १२.२ टक्क्यांवर पोहोचली. एकूण डीएमएफ मालकीम ध्ये पॅसिव्ह फंडांचा हिस्सा सार्वकालिक उच्चांकाजवळ, म्हणजे २.१ टक्क्यांवर स्थिर राहिला, तर सक्रियपणे व्यवस्थापित फंडांचा हिस्सा तिमाही तुलनेत १९ बेसिस पॉइंट्सने वाढून ९.५ टक्क्यांवर पोहोचला. एफपीआयच्या उलट, डीएमएफनी जून २०२६ च्या तिमाहीत वित्तीय क्षेत्रावरील अधिक-भारांकित भूमिका आणखी मजबूत केली असून हा कल बहु-तिमाही उच्चांकावर पोहोचला आहे.